**तक्रारदाराची स्वतःची साक्ष**

**<u>शपथेवर सुरु...</u>**

**<u>तक्रारदाराची शपथेवर पुढील सरतपासणी – तक्रारदाराचे वकील श्री. बी.आर. कावरे</u>**

01. मी निशाणी **<u>नि. यु–11</u>** वर पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये लिहलेला मजकूर बरोबर आहे व त्याखाली माझी सही आहे.

**<u>तक्रारदाराची शपथेवर उलटतपासणी – श्री. वाय.आय. ठोले वकील जाब देणार तर्फे</u>**

02. हे म्हणणे खरे नाही की, माझेत व इंडस टॉवर मध्ये नोकर – मालक संबंध नाही. मला मासिक पगार टिम लिजकडून मिळत होता. मला प्रोव्हीडंट फंडचे बेनेफिट तसेच इएसआयचे फायदे मिळत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचे रेकॉर्ड टिम लिज ठेवत होती. हे म्हणणे खरे आहे की, मी अॅक्वे मॅनपॉवर यांना पक्षकार म्हणून सामील केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांच्याकडे काम करीत होतो असे मी खोटे सांगत आहे. इंडस टॉवर व टिम लिज यांच्यातील करार 29/09/2017 मध्ये संपुष्टात आल्याबाबत मला माहिती नाही. त्यानंतर टिम लिज यांच्याकडून इंडस टॉवर यांना कामगार पुरविले जात नाहीत याबाबत मला माहित नाही. दि.01 जानेवारी 2022 मध्ये नवीन ठेकेदार आला त्याचे नाव प्रताप असे होते. संपूर्ण नाव मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी खोटे सांगत आहे. मला प्रताप कंपनीच्या सुपरवायझरनी मस्टरवर सही करू दिली नाही व कामदेखील दिले नाही. मी मॅगनम इनव्हायरमेंट मॅनेजमेंट प्रा.लि. या कंपनीला प्रकरणात सामील का केलो नाही त्याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व इंडस टॉवर यांच्यांत नोकर–मालक संबंध नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, इंडस टॉवर व माझेमध्ये नोकर–मालक संबंध नसलयामुळे कोणताही निर्णय घेण्याचा इंडस टॉवर यांना अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>तक्रारदाराची शपथेवर उलटतपासणी – श्री. गाडेकर वकील जाब देणार क्रं.2 तर्फे</u>**

03. हे म्हणणे खरे नाही की, माझी टिमलिजच्या विरूध्द कसल्याही प्रकारची तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी टिम लिजमध्ये कॉन्ट्रॅक्ट बेसीस काम करीत होतो. माझी टिम लिझ विरूध्द तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, टिम लिज यांना चुकीने पक्षकार म्हणून सामील केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे व खोटे शपथपत्र तयार केले आहे.

उलटतपास : संपुर्ण
फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत..**

Digitally signed by
SHIRISH SUDHAKAR
SAHASRABUDHE
Date: 2025.08.08 14:50:46
+0530

औरंगाबाद
दि.07/08/2025

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
न्यायाधीश
2रे कामगार न्यायालय, औ.बाद.